लटकविल्याने, खेळणी, कोडी (Puzzles), कॉम्प्यूटर, व्हिडीओ गेम्स, चित्रमय पुस्तके हाताळण्याची संधी दिल्याने तसेच त्यांना सृजनात्मक कार्यात (चित्रकाम, कातरकाम, रंगकाम, चिखलकाम इ.) रममाण ठेवल्यानेही बालकाचे अवधान वाढण्यास मदत होते.

❍ **बालकाच्या भाषेवर विविध बाबींचा होणारा प्रभाव** बालक थोडे मोठे झाले की, ते आपल्या समवयीन मित्र - मैत्रिणीत, शेजारी मिसळावयास लागतात. साहजिकच त्यांच्या भाषेचा प्रभाव बालकांच्या भाषेवर पडतो. तेंव्हा बालकास शक्यतो चांगली भाषा असणाऱ्या व्यक्तींच्या सहवासात ठेवावे. बालकासाठी चांगल्या शाळा - महाविद्यालयाची निवड करावी. म्हणजे तेथेही त्यांना चांगल्या शिक्षकांचे, वर्ग मित्रांचे सानिध्य लाभते व यामुळेही त्यांच्या भाषा विकासास मदत होते. याशिवाय लहानपणापासूनच बालकास वाचनाची गोडी लावणे, बालकासाठी शालेयतर पुस्तके खरेदी करणे किंवा त्यास ते उपलब्ध करुन देणे, वक्तृत्व, वादविवाद तसेच निबंध यासारख्या स्पर्धामध्ये सहभागी होण्याची संधी देणे, व्यासपीठावर भाषण करण्याचे धैर्य निर्माण करणे इत्यादी बाबींमुळे भाषा विकासात चांगलीच भर पडते.

**व्यक्तीतील भाषा - दोष कसे दूर करावेत ?**

☆ व्यक्ती बोलत असतांना शब्दोच्चाराकडे, व्याकरणाकडे लक्ष द्यावे. त्यात कांही त्रुटी आढळल्यास वेळीच त्या दुरुस्त कराव्या.

☆ व्यक्तीस एखादा शब्द विनाकारण वारंवार उच्चारण्याची सवय असेलतर त्याला वेळीच समज द्यावी.

☆ मध्येच अडखळत, हां... हूँ करत बोलण्याची सवय असेलतर वेळीच प्रतिबंध करुन व्यक्तीस सफाईदारपणे बोलण्याची सवय लावावी.

☆ स्वत: कसे बोलतो याची जाणीव होण्यासाठी व्यक्ती बोलत असतांना त्याच्या बोलण्याचे ध्वनीमुद्रण अथवा दृक-श्राव्य मुद्रण करुन त्याला ते ऐकावयास / पहाण्यास लावणे. आरश्यातील स्वप्रतिमेकडे पाहून बोलणे अशामुळेही भाषेतील त्रुटी दूर होऊ शकतात.



❍ **संभाषण कौशल्य विकसनात महत्त्वाच्या बाबी**

☆ भाषेवर प्रभुत्व

☆ स्पष्ट शब्दोच्चार

☆ इतर कसे बोलतात त्याचे निरिक्षण करणे

☆ इतर काय बोलतात ते व्यवस्थित ऐकूण घेणे

☆ मोजक्या व अचूक शब्दात आपले विचार मांडणे

☆ इतरांना बोलण्याची संधी देणे

☆ उचीत देहबोलीचा वापर

☆ आवश्यक तेवढ्या आवाजात बोलणे

☆ चेहऱ्यावर योग्य हावभाव असणे

☆ बोलण्याची गती योग्य ठेवणे

☆ बोलण्यात मार्दव तथा नम्रपणा असणे

☆ आवश्यक ठिकाणी आवश्यक वेळी व आवश्यक तेवढेच बोलणे अशा बाबी संभाषण कौशल्य विकसीत करण्यास महत्त्वाच्या ठरतात.




*लेखिका*

प्रा. विशाला पटनम, प्रा. जया बंगाळे व प्रा. रमनम्मा डेसेट्टी

बालविकास विभाग

गृह विज्ञान महाविद्यालय म.कृ.वि. परभणी

✆ २२३८०१ विस्तारीत ३८१






# संभाषण कौशल्य - यशाचे गमक


बाल विकास विभाग

**गृह विज्ञान महाविद्यालय**

मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी (महाराष्ट्र)

(२००३)

# संभाषण कौशल्य - यशाचे गमक

सर्व प्राणीमात्रांमध्ये केवळ मानवजातीसच भाषेचे वरदान मिळालेले आहे. मानवास भाषा अवगत असल्यामुळेच स्वत:चे विचार मांडणे, भावना व्यक्त करणे, स्वत:च्या तसेच इतरांच्या समस्या सोडवणे, इतरांना समजून घेणे, घनिष्ठ परस्पर संबंध विकसीत करणे इ. बाबी सहज साध्य होतात.

मानवी जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. व्यक्तीस संभाषण कौशल्य असणे ही तर काळाची गरज झाली आहे. भाषा ही शाब्दिक (Verbal) असो की अशाब्दिक (Non Verbal), लिखित असो की अलिखित, व्यक्तिचे भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक झाले आहे. ज्या व्यक्तींमध्ये संभाषण कौशल्य तथा चातुर्य आहे अशा व्यक्ती जीवनात हमखास यशस्वी होतात. उदाहरणच द्यावयाचे झाले तर तेनाली रामन, बिरबल, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी या व्यक्ती त्यांच्यात असणारे संभाषण कौशल्य, चातुर्य तथा हजर जबाबीपणा या सारख्या गुणांमूळे नावाजल्या गेल्या. व्यक्तीमध्ये संभाषण कौशल्य असेल तर त्यांना समाजात मान्यता (Acceptance) मिळते. संभाषण कौशल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलते. अशा व्यक्तीस कुटुंबात व समाजात मानाचे स्थान मिळते. परंतू दुर्दैवाने समाजात बहुतांशी व्यक्तींना संभाषण कौशल्या विषयी कल्पना नसते. जीवनात जर यशस्वी व्हावयाचे असेल तर प्रत्येकाने संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करावयास हवे. तेंव्हा मानवी जीवनात भाषा तसेच संभाषण कौशल्याचे महत्त्व जाणून घेऊया.



### ❍ बालकांचा भाषा - विकास कसा होतो ?

दररोज कानावर पडणाऱ्या शब्दनादांवरुन, विविध आवाजांद्वारे, चेहऱ्याच्या विविध हावभावांद्वारे, ओठांच्या हालचालींवरुन तसेच अनुकरणाने बालके बोलण्यास शिकतात. 'बोलावयास शिकणे' ही एक दिर्घ प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया घडत असतांना प्रथम विविध शब्द ऐकणे, ते शब्द स्मरणात ठेवणे आणि स्मरणात ठेवलेल्या शब्दांचा गरजेनूसार योग्यवेळी वापर करणे असा पायरी पायरीने भाषेचा विकास होत असतो.

### ❍ दर्जेदार भाषेमध्ये समाविष्ट असणारे घटक

☆ विपूल शब्दसंग्रह
☆ अचूक श्रवण
☆ अचूक शब्दोच्चार, वाक्यरचना तथा व्याकरण
☆ आवाजातील चढ उतार
☆ उचीत देह बोली
☆ आकलन

बालकांच्या समृद्ध भाषा विकासाकरिता कुटुंबियांनी उपरोक्त सर्व घटक ध्यानात घेणे गरजेचे असते.

बालकांना लहानपणी (शिशू अवस्थेत) बोलता जरी येत नसले तरी त्यांच्या सभोवतालच्या व्यक्ती काय बोलत आहेत हे त्यांच्या चेहऱ्याच्या हावभावावरुन तसेच आवाजाच्या चढउतारावरुन कांहीसे लक्षात येण्यास सुरुवात होते. जन्मानंतर कांही महिन्यातच ते सभोवतालच्या व्यक्ती तथा वस्तू ओळखू लागतात. तसेच त्यांना कांही शब्दांचे अर्थही समजावयास लागतात. उदा. पंखा कुठे आहे ? असे विचारले की त्यांची नजर पंख्याकडे जाते. याचाच अर्थ असा की, आता त्यांना हळूहळू भाषा समजायला लागलेली असते. या काळात बालकाच्या भाषा विकासाकरिता त्यांना जास्तितजास्त शब्द, आवाज ऐकण्याची संधी



मिळावयास हवी. बालकाच्या ऐकण्याचा व भाषेचा परस्पर संबंध असल्यामूळे त्यांचे ऐकण्याचे कौशल्य विकसीत होण्यासाठी त्यांच्यासोबत बोलत असतांना खालील बाबींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

### ❍ बालकासोबत कसे बोलावे ?

बालकासोबत बोलत असतांना ...



☆ सोपे शब्द वापरावे
☆ वाक्य लहान असावे
☆ बोलण्याचा वेग कमी असावा
☆ स्पष्ट शब्दोच्चार असावेत
☆ चेहऱ्यावर अचूक हावभाव असावेत
☆ आवाजात चढ - उतार करावा
☆ ज्या वस्तू / व्यक्ती विषयी बोलत आहोत त्याकडे अंगुली निर्देश करुन बोलावे
☆ बोबडे बोल कटाक्षाने टाळावे
☆ ठरावीक शब्दासाठी प्रतिशब्द वापरणे टाळावे. उदा. पाण्यास - पापा, झोपेस नि नि इ.
☆ बालकाच्या नजरेस नजर भिडवून बोलावे.
☆ योग्य देहबोली (Body Language) असावी.

उपरोक्त बाबींसोबतच बालकास गाणे - गोष्टी सांगून, चित्रांची आकर्षक पुस्तके दाखवून, सभोवतालच्या गोष्टींची (वाहने, पक्षी, प्राणी, फुले, झाडे इ.) नांवे सांगून, शक्य असल्यास बालगीते गोष्टींच्या ध्वनीफिती, रेडीओ, दुरदर्शन इत्यादी माध्यमांचा वापर करुन तसेच बालकास इतरांमध्ये मिसळण्याची संधी देऊनही बालकाचा उत्कृष्ट भाषा विकास साधता येतो. भाषा विकासासाठी बालकामध्ये अधीक अवधान (Attention span) असण्याची आवश्यकता असते. बाळाच्या पाळण्यावर मंजूळ आवाज करणारी आकर्षक रंगीत खेळणी

